# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः06.09.2026** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. संविधानातील 'समान संधी'चे आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.
2. विद्यार्थ्यांचं भविष्य घडवतानाच त्यांचं बालपण जपण्यात शिक्षकांनी महातवची भूमिका बजावावी-पंतप्रधान नरेंद्र मोदी याचं आवाहन.
3. 'ग्लोबल इम्पॅक्ट फोरम 2026' चं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन.
4. सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत दुहेरीच्या अंतिम फेरीत.
5. महिला आशिया चषक टी-20 स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय.

**राष्ट्रपति-शिक्षकदिन**

शिक्षकांचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थानं प्रगत असून आपल्या संविधानातील 'समान संधी'चे आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन असल्याचं असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. शिक्षक दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2026' सोहळ्याला संबोधित करताना त्या काल बोलत होत्या. दर्जेदार शिक्षणाशिवाय 'विकसित भारत' साकारणं शक्य नसून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळा सोडण्याचं प्रमाण नगण्य पातळीवर आणणं शिक्षकांच्या प्रयत्नांमुळंच शक्य झाल्याचं त्या म्हणाल्या. शिक्षण तसंच महिलांचे अधिकार याबाबतीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करताना त्या म्हणाल्या सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणासाठी क्रांतिकारी कार्य केलं असून त्यांना राष्ट्रपतीनी अभिवादन केलं.

राष्ट्रपतींच्या हस्ते काल 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आले. यात 27 राज्यं, सात केंद्रशासित प्रदेश आणि केंद्र सरकारच्या सहा संस्थांमधील 48 निवडक शालेय शिक्षकांचा समावेश होता. यात महाराष्ट्रातील 9 गुणवंत शिक्षकांचा समावेश होता. या कार्यक्रमात प्रत्येक पुरस्कार विजेत्याच्या उल्लेखनीय कार्यावर आधारित लघुपटही दाखवण्यात आले. या प्रसंगी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, शिक्षण राज्यमंत्री जयंत सिंह आणि अधिकारी वर्ग उपस्थित होता.

**पंतप्रधान-शिक्षकदिन**

शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरतं मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांचं भविष्य घडवतानाच त्यांचं बालपण जपण्यातही महत्त्वाची भूमिका बजावावी, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षकांना केलं आहे. नवी दिल्ली इथं काल 'राष्ट्रीय शिक्षक दिन पुरस्कार' विजेत्यांशी संवाद साधताना त्यांनी हे विचार मांडले. पंतप्रधानांनी अमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेच्या वाढत्या धोक्याचा उल्लेख करून मुलं नकळतपणे या पदार्थांच्या आहारी जाऊ शकतात, त्यामुळं याविषयी सतत जागरूकता निर्माण करणं आवश्यक असल्यांचं सांगितलं. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा' उल्लेख करत, मुलांना वर्गाबाहेर नेऊन त्यांना प्रत्यक्ष जगातील कौशल्यं आणि विविध प्रकारच्या कामांशी जोडण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

**एसआरसीसी**

भारतीय तरुणांनी आधीच्या पिढ्यांपेक्षा मोठी स्वप्ने पाहावीत आणि जागतिक स्तरावर नेतृत्व करणाऱ्या कंपन्या उभाराव्यात, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. भारतात निर्माण झालेल्या सल्लागार, लेखा, वित्तीय आणि कायदेविषयक

कंपन्यांनी जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता विकसित करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दिल्ली विद्यापीठातील श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी बोलत होते. जागतिक पातळीवरील अनिश्चिततेच्या वातावरणात भारताने नोंदविलेला 7 पूर्णांक 8 टक्के तिमाही आर्थिक विकासदर हा देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं. आज जग भारताकडे वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून पाहत असल्याचं त्यांनी नमूद केले. तरुणांची ऊर्जा, उद्योजकता, नवोन्मेष आणि मोठी स्वप्ने यांच्या बळावर भारताला जागतिक नेतृत्वाच्या नव्या टप्प्यावर नेण्याचे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केले.

**<u>ग्लोइफो-मुख्यमंत्री फडणवीस</u>**

जगातील विविध देशांच्या संस्कृती, परंपरा, विचारसरणी आणि जीवनपद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी मानवतेला जोडणारी सार्वत्रिक मूल्ये समान आहेत. या समान मूल्यांचा शोध घेत सांस्कृतिक देवाणघेवाण, परस्पर सन्मान आणि संवादाची व्याप्ती वाढवण्याची गरज असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल मुंबईत 'ग्लोबल इम्पॅक्ट फोरम 2026' च्या दुसऱ्या पर्वाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी मुंबईतील ब्राझीलचे महावाणिज्यदूत जोसे मौरो फोनेस्का कोस्टा कौटो, रशियाचे महावाणिज्यदूत इव्हान फेतिसोव्ह, चीनचे महावाणिज्यदूत किन ती, दक्षिण आफ्रिकेचे महावाणिज्यदूत गेडियन लाबाने यांच्यासह ब्रिक्स देशांतील राजनैतिक प्रतिनिधी, उद्योगपती, अभ्यासक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

फडणवीस यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देत भगवान श्रीकृष्णांच्या सर्वसमावेशकता, धर्मनिष्ठा आणि सत्याच्या विजयाच्या संदेशाचा उल्लेख केला. भारतीय संस्कृतीच्या मूलभूत विचारांचा पाया 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेत असून भारताने वस्तू आणि व्यापार यांच्याबरोबर विचार, ज्ञान आणि जीवनमूल्यांचाही जगभर प्रसार केल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<u>नियुक्ती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी डॉ. दिनेश शर्मा यांची अंदमान आणि निकोबार बेटांचे नायब राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे. डॉ. शर्मा हे निवृत्त ॲडमिरल देवेंद्र कुमार जोशी यांची जागा घेतील. डॉ. शर्मा हे सध्या उत्तर प्रदेशातून राज्यसभेचे खासदार आहेत आणि त्यांनी यापूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणूनही काम केलं आहे.

**<u>अमित शाह-पूल-रश्मी</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यासाठी काल रात्री दाखल झाले. या दौऱ्यादरम्यान ते पश्चिम विभागीय परिषदेच्या 28व्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील. शाह यांच्या अध्यक्षतेखाली गृह मंत्रालयाची आज बैठक होणार आहे. त्यानंतर ते पत्रकार परिषदेला संबोधित करणार आहेत. तसंच भाजपच्या नव्या प्रदेश कार्यालयाचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>दहीहंडी</u>**

महाराष्ट्रासह देशभरात काल दहीहंडीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबई, पुणे, ठाणे यासह विविध शहरात गोविंदा पथकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत विविध दहीहंडी उत्सवांना भेट दिली. दहीहंडीच्या उत्सवामधून 'नशामुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेला बळकटी देण्याचं काम व्हावं, असं आवाहन फडणवीस यांनी केलं.

**<u>ओपीएस-मोर्चा</u>**

ओपीएस अर्थात जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, आठवा वेतन आयोग कर्मचारी हिताच्या दृष्टीने लागू करावा, कंत्राटी आणि मानधन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करावे, सरकारी विभागांतील रिक्त पदे भरावीत तसंच सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरणाला आळा घालावा, या प्रमुख मागण्यांसाठी 12 डिसेंबरला नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्यावतीनं राष्ट्रीय मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात देशभरातून लाखो कर्मचारी, पेन्शनधारक आणि कामगार सहभागी होणार असल्याची माहिती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष लांबा यांनी काल नागपूर इथं पत्रकार परिषदेत दिली.

**विशेष न्यायालय-निर्णय**

छत्तीसगडमध्ये झीरम खोऱ्यातील नक्षलवादी हल्ला प्रकरणात जगदलपूरमधील राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयानं सर्व दहा आरोपींना दोषी ठरवलं आहे. या प्रकरणात एकंदर 11 आरोपींवर खटला चालवण्यात आला होता. त्यापैकी एका आरोपीचा मृत्यू झाला आहे. 29 जणांच्या हत्येला तसंच अन्य 15 जणांच्या हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन महिलांसह सर्व दहा आरोपी दोषी आढळले आहेत. शिक्षेबाबतचा निर्णय न्यायालयानं येत्या 16 तारखेपर्यंत राखून ठेवला आहे. मे 2013 मध्ये झीरम खोऱ्यात नक्षलवाद्यांनी काँग्रेस नेत्यांच्या ताफ्यावर हल्ला केला होता. या हल्ल्यात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसह 29 जणांचा मृत्यू झाला होता.

**अमेरिका-इराण**

होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या आणि अमेरिकेशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या तीन जहाजांवर इराणनं हल्ले केले असल्याचा दावा इराणच्या आयआरजीसी अर्थात इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या नौदलानं केला आहे. अमेरिकेनं पर्शियन आखात आणि ओमानच्या समुद्रात तीन इराणी तेलवाहू जहाजांवर हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर हे वृत्त आलं आहे.

**पुतिन**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी काल क्रेमलिनमध्ये अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जारेड कुशनर यांच्याशी चर्चा केली. रशिया-युक्रेन संघर्ष संपवण्यासाठीच्या प्रयत्नांना पुन्हा गती देण्याच्या उद्देशानं ही चर्चा झाली. दरम्यान, रशिया आणि युक्रेन दरम्यान हवाई हल्ले सुरूच आहेत. पुतिन यांनी कीव्हवरील रशियन हल्ल्यांना तीन दिवसांची स्थगिती देण्याचे आदेश दिले.

**बॅडमिंटन**

भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी काल चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या भारतीय जोडीने काल शेन्झेन इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मलेशियाच्या नूर मोहम्मद अयुब अझरीन आणि टॅन वी किओंग यांचा 21-15, 18-21, 21-11 असा पराभव केला. आज अंतिम सामन्यात चीनच्या हे जी टिंग आणि रेन शियांग यू यांच्याशी त्यांचा सामना होणार आहे.

**क्रिकेट**

महिला आशिया चषक टी-20 स्पर्धेत दुबई इथं काल झालेल्या एकतर्फी सामन्यात भारतानं पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला. पाकिस्तानचा संघ 19 व्या षटकांत केवळ 55 धावांत सर्वबाद झाला; बिनबाद 27 अशी सुरुवात केल्यानंतर पुढील 28 धावांत त्यांनी 10 खेळाडू गमावले. टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्यांची ही आतापर्यंतची सर्वात कमी धावसंख्या ठरली. श्री चरणीनं 7 धावांत 3, प्रेमा रावतने 9 धावांत 3 तर दीप्ती शर्माच्या खात्यात दोन बळी जमा झाले. श्रीचरणीला सामनावीर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.